# महाराष्ट्रातील गोदाम क्षेत्राचा अभ्यास

**डॉ. अरुण बळीराम धालगडे**
विभागप्रमुख, वाणिज्य विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगतीशील राज्य मानले जात आहे. कृषी आणि ग्रामीण विकासाच्या दृष्टिने नियोजनबध्द प्रयत्न करणा-या राज्यांमध्ये महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेप्रमाणेच महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेतसुध्दा शेतीला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण काढत्या लोकसंख्येला पोसण्यासाठी आवश्यक असणारे अन्नधान्याचा पुरवठा शेतीतूनच होतो. शिवाय विविध प्रकारच्या उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा मालही शेतीतून प्राप्त होतो. शेतीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी शेतीस आधुनिक साधने, बि-बियाणे, पाणीपुरवठा, बाजारपेठांच्या सोयी, साठवणूकीच्या सोयी इत्यादी घटकांची उपलब्धता करुन दिली जात आहे. वस्तू व अन्नधान्याच्या योग्य साठा करुन ठेवण्यासाठी सर्व बाजारपेठांमध्ये गोदामांच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. गोदामाच्या शितगृहांच्या सोयी उपलब्ध झाल्यातर शेतकरी व व्यापारी वर्गाला बाजारपेठेतील गरजेनुसार मालाचा पुरवठा करता येतो. तसेच गोदामाच्या सोयीमुळे हंगामानंतरच्या काळातील वस्तूच्या व शेतमालाच्या किंमतीतील घसरण टाळता येते. अल्प दरांत पुरेशा प्रमाणात, नजिकच्या ठिकाणी अशी गोदामे उपलब्ध करुन दिली आहेत. गोदामामध्ये माल ठेवल्यानंतर त्यांच्या पावतीच्या तारणावर बँकाकडून कर्ज मिळू शकत आहे. त्यामुळे शेतक-यांची व व्यापा-यांची आर्थिक अडचण दूर होत आहे. सध्या गोदामाच्या सोयी अत्यंत कमी आहेत. त्यामुळे दरवर्षी १० ते २० टक्के धान्याची उंदीर, घुशी, किटक इत्यादींपासून नासाडी होते. यासाठी साठवणूकीच्या शास्त्रशुध्द व पुरेशा सुविधा उपलब्ध झाल्यास शेतक-यांची प्रतीक्षा क्षमता वाढून त्यांचा फायदा घेता येणार आहे. प्रक्रिया करुन नवीन वस्तू तयार/उत्पादित करताना मूळ वस्तू व मालाचा साठा गोदामात करुन ठेवावा लागतो.[१]

**संशोधनपत्राचे उद्देश-**

१. महाराष्ट्रातील गोदाम क्षेत्राविषयीची माहिती गोळा करुन अभ्यास करणे.
२. महाराष्ट्रातील निरनिराळ्या गोदाम क्षेत्राची संख्या व साठवणूक क्षमता अभ्यास करणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत-**

१. संशोधनपत्रासाठी संदर्भग्रंथ, वार्षिक अहवाल व वेबसाईट इ. दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे.

बाजारातील शेतमालाच्या किंमतीचा विचार करुन अधिप्राप्तीने किंमती ठरविल्या जातात. शेतमालाचा पुरवठा वाढून किंमती घसरू लागल्या तर सरकार अधिप्राप्ती किंमतीला त्या मालाची खरेदी करते व बाजारातील मागणी पुरवठ्यात संतुलन निर्माण करू शकते. खरेदी केलेल्या शेतमालाचे शिलकी साठे करण्यासाठी गोदामाची निर्मिती करावी लागते. बाजारात शेतमालाचा पुरवठा कमी होऊन त्यांच्या किंमती वाढू लागल्या की गोदामातील साठवणूक ठेवलेले शिलकी साठे खुल्या बाजारात विकले जातात. केंद्र सरकारच्या दरवर्षी किंमत विषयक धोरणानुसार राज्यातील शेतक-याच्या धान्याला विशिष्ट किंमतीची हमी मिळते, किमान उत्पन्न मिळण्याची शाश्वती मिळते व शेतीमालाच्या उत्पादन वाढीची प्रेरणा मिळते. तसेच ज्या शेतमालाची निर्यात होते त्याबाबत केंद्र सरकार लवचिक धोरण स्वीकारते. यासाठी गोदाम क्षेत्राचा फार उपयोग होतो.[२]

भौगोलिक क्षेत्र व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र हे देशातील दुस-या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राची राजधानी असलेली मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. जवळ सर्वच प्रमुख निगम व वित्तीय संस्था याची मुख्यालये मुंबईतच आहेत. देशातील प्रमुख वायदे, भांडवली बाजार आणि विक्रेय वस्तू व्यापार केंद्रे मुंबईतच आहेत. चालू किंमतीनुसार २०११-१२ या वर्षाचे स्थूल राज्य उत्पन्न रू.११,९९,५४८ कोटी असून देशांतर्गत स्थूल उत्पन्नात

राज्याचा सुमारे १४.४ टक्के हिस्सा आहे. राज्यातील औद्योगिक व सेवा या दोन्ही क्षेत्राचा राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा सुमारे ८७.१ टक्के आहे. कृषि व संलंग्न कार्य या क्षेत्राचा राज्य उत्पन्नातील हिस्सा १२.९ टक्के आहे. महाराष्ट्र हे सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. भारतातील औद्योगिक क्षेत्रामध्ये राज्याने आपले आघाडीचे स्थान कायम राखले आहे. लघु उद्योगात हे राज्य अग्रेसर आहे. मानव विकास निर्देशांकाची प्रगती ही अनेक वेळा राज्याच्या मुख्य विकास निर्देशांकाची प्रगती दर्शवित असते. भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार राज्याचा मानव विकास निर्देशांक ०.५७२ असून राज्याचा देशात पाचवा क्रमांक आहे.[३]

तक्ता क्र.१

**महाराष्ट्रातील उपलब्ध असलेल्या गोदामाची संख्या व साठवणूक क्षमता**

| अ.क्र. | गोदाम धारक | संख्या | टक्केवारी | साठवणूक क्षमता मे.टन | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | शासकीय गोदाम | १,००५ | ३७ | ६,०७,५१५ | १७ |
| २. | राज्य वखार महामंडळ | ८२३ | ३१ | १३,८४,१९४ | ३८ |
| ३. | केंद्रीय वखार महामंडळ | १८ | ०१ | ६,१५,८०१ | १७ |
| ४. | खाजगी नोंदणी परवानाधारक गोदाम | ७१९ | २६ | ७,९३,६८५ | २१ |
| ५. | सहकारी फेडरेशन | १२८ | ०५ | २,५२,२०० | ७ |
| | | **२,६९३** | **१००** | **३६,५३,४९९** | **१००** |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, WDRA अहवाल, (C.W.C. Website Marketing Federation) ४

तक्ता क्र..१ मध्ये महाराष्ट्रातील शासकीय गोदामे, केंद्रीय व राज्य वखार महामंडळाची गोदामे, खाजगी नोंदणीधारकांची गोदामे व सहकारी फेडरेशन गोदामे यांची संख्या व साठवणक्षमता दिलेली आहे.

## निष्कर्ष

महाराष्ट्रातील गोदामाच्या संख्येचा विचार केल्यास असा निष्कर्ष काढता येतो की, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची स्वतःची व भाड्याची गोदाम संख्या ८२३ आहे ते ३१ टक्के आहे. हे महामंडळ व्यावसायिक व कार्यक्षमपणे कार्य करीत असून ते दुस-या स्थानी आहे तसेच गोदामाच्या साठवणूक क्षमतेत ते प्रथम स्थानी आहे. हे महामंडळ शास्त्रीय पध्दतीने मालाची साठवण करून जोपासना करीत आहे. शासकीय गोदामे महाराष्ट्रात सर्वात जास्त १००५ इतकी (३७%) असून साठवणूक क्षमतेत ती तिस-या स्थानी (१७%) आहेत. महाराष्ट्रात खाजगी परवानाधारकांची संख्या ७१९ इतकी आहे. परंतु साठवणूक क्षमतेत दुस-या स्थानी असून त्याचे प्रमाण २१ टक्के आहे. सहकारी क्षेत्राची गोदामाची उपलब्ध संख्या १२८ इतकी आहे. त्याची साठवण क्षमता सर्वात कमी म्हणजे ७ टक्के आहे.

## संदर्भ

१. गौरव दत्त व आश्विनी महाजन, इंडियन इकॉनॉमी, यश चॉंद आणि कंपनी, दिल्ली, २०१५ पृ. क्र.८३२.
२. डॉ.विजय कविमंडल, कृषि आणि ग्रामीण अर्थशास्त्र, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१२, पृ.क्र.२६८.
३. अर्थसांख्यिकी संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१२-१३, पृ.क्र.२.
४. स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, WDRA अहवाल, (C.W.C. Website Marketing Federation)